# भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका,भिवंडी

प्रस्तावना :

**विषय :- भिवंडी मनपातील पर्यावरण विभागामार्फत सुरु असलेल्या हवा सर्वेक्षण प्रकल्पास दिनांक ०३ जानेवारी २०२५ ते ३० नोव्हेंबर २०२५ पर्यंत मुदतवाढ मिळणेबाबत.**

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका अंतर्गत हवा सर्वेक्षणाचे काम माहे मार्च २०११ पासून मा.महाससभेच्या मान्यतेने मंजुर अटी व शर्ती नुसार ठोक वेतनावर आम्हास नियुक्ती करुन सुरु करण्यात आले. सदर प्रकल्पास वेळोवेळी मा.स्थायी समितीच्या मान्यतेने मुदतवाढ घेण्यात आलेली आहे. सद्यस्थितीत भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या पर्यावरण विभागामार्फत ३ हवा सर्वेक्षण केंद्राचे कामकाज सूरु असून त्याकरीता संपूर्ण खर्च केंद्र शासनद्वारे प्राप्त होत आहे. संदर्भ क्र.२ अन्वये **केंद्रीय प्रदूषण नियंत्रण बोर्ड, पर्यावरण, वन एवं जलवायू परिवर्तन मंत्रालय, भारत सरकार यांचेकडील पत्र क्र. ए-१८०११/६३/२००० (पार्ट२)/एम. ओ. एन. दि.११/०८/२०१६** अन्वये कळविण्यात आले आहे. सदर प्रकल्पास, प्रकल्पातील ०१ पर्यावरण निरिक्षक तथा केमिस्ट व ०३ क्षेत्र सहाय्यक या ठोक वेतनावरील कर्मचाऱ्यांना मा. प्रशासकीस ठराव क्र.३४० दिनांक ०१/०२/२०२४ रोजीचा ठरावा अन्वये दि.०३/०१/२०२४ नूसार दि.३१/१२/२०२४ पर्यंत मुदतवाढ घेण्यात आलेली आहे.

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका अंतर्गत सूरु असलेल्या केंद्रीय हवा प्रदूषण सर्वेक्षणाअंती सद्यस्थिती वातावरणात होणारे बदल व हवेची गुणवत्ता सुधारणेचे उदिष्ट निश्चित केलेले असल्याने भिवंडी शहरामध्ये महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत नियमितपणे **Continuous Ambient Air Quality Monitoring Station** कार्यान्वित असून भिवंडी शहरातील हवेची गूणवत्ता व वातावरणात होणारे बदल याबाबत नियमितपणे मोजमाप होणार असल्याने सदर प्रकल्प भिवंडी मनपास निश्चितच उपयुक्त ठरत आहे.

केंद्रीय प्रदुषण नियंत्रण मंडळ, पर्यावरण वन एवं जलवायू परिवर्तन मंत्रालय, भारत सरकार यांचेकडील मान्यतेनुसार भिवंडी मनपा अंतर्गत सुरु असलेले हवा सर्वेक्षणप्रकल्पास कायमस्वरुपी मान्यता मिळाली आहे. त्याअनुषंगाने सदर हवा सर्वेक्षण केंद्र शासनातंर्गत विलिन झाले असून त्याकरीता संपुर्ण अनुदान मिळत आहे. त्याअन्वये सदर केंद्रीय हवा सर्वेक्षण प्रकल्पास व प्रकल्पावरील कर्मचा-यांना कायमस्वरूपी मान्यतेच्या अधिन राहुन मा.अतिरिक्त संचालक, हवा प्रदुषण नियंत्रक, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ मुंबई, यांचेकडील मंजुरी पत्र क्र. **MPCB/JD-APC/SAMP- Extn/B-0082, DATE - 10/12/2024** रोजीचे पत्रान्वये सदर प्रकल्पास, प्रकल्पातील ०१ पर्यावरण निरिक्षक तथा केमिस्ट व ०३ क्षेत्र सहाय्यक या ठोक वेतनावरील कर्मचारी यांना मुदत वाढ देणेकामी पत्र प्राप्त झालेले आहे. परंतु सद्यस्थितीत मा. महासभा व मा. स्थायी समिती गठीत नसल्याने, महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग शासन निर्णय क्र. एमसीओ-२०२०/ प्र.क्र.७१ (भाग-२)/नवि, दि.०६/०६/२०२२ नुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेष:त कलम ४५२ अ (१अ)व (१ब) अन्वये वरील ठोक वेतन कर्मचाऱ्यांची ठोक वेतनावर पुर्ननियुक्ती होणेस मा. प्रशासक तथा आयुक्त सो., यांची मंजुरी मिळणेस आवश्यक आहे.

तरी भिवंडी महानगरपालिका अतंर्गत सुरु असलेले हवा सर्वेक्षण प्रकल्पास, प्रकल्पातील ०१ पर्यावरण निरिक्षक तथा केमिस्ट व ०३ क्षेत्र सहाय्यक या ठोक वेतनावरील कर्मचाऱ्यांना दोन दिवसाचा विखंड देऊन ०३ जानेवारी २०२५ ते ३० नोव्हेंबर २०२५ पर्यंत मुदतवाढ मिळणेस प्रशासकीय व अर्थिक मंजुरीस्तव सविनय सादर.

ठराव क्रं. :- ८७८ दिनांक :- २३/०७/२०२५

केंद्रीय प्रदुषण नियंत्रण मंडळ, पर्यावरण वन एवं जलवायू परिवर्तन मंत्रालय, भारत सरकार यांचेकडील मान्यतेनुसार भिवंडी मनपा अंतर्गत सुरु असलेले हवा सर्वेक्षणप्रकल्पास कायमस्वरुपी मान्यता मिळाली आहे. मा.अतिरिक्त संचालक, हवा प्रदुषण नियंत्रक, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ मुंबई, यांचेकडील मंजुरी पत्र क्र. **MPCB/JD-APC/SAMP- Extn/B-0082, DATE –10/12/2024** रोजीचे पत्रान्वये सदर प्रकल्पास, प्रकल्पातील ०१ पर्यावरण निरिक्षक तथा केमिस्ट व ०३ क्षेत्र सहाय्यक या ठोक वेतनावरील कर्मचारी यांना मुदत वाढ देणेकामी पत्र प्राप्त झालेले आहे. परंतु सद्यस्थितीत मा. महासभा व मा. स्थायी समिती गठीत नसल्याने, महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग शासन निर्णय क्र. एमसीओ-२०२०/ प्र.क्र.७१ (भाग-२)/नवि, दि.०६/०६/२०२२ नुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषःत कलम ४५२ अ (१अ)व (१ब) अन्वये वरील ठोक वेतन कर्मचाऱ्यांची ठोक वेतनावर पुर्ननियुक्ती होणेस मा. प्रशासक तथा आयुक्त सो., यांची मंजुरी मिळणेस आवश्यक आहे. तरी भिवंडी महानगरपालिका अतंर्गत सुरु असलेले हवा सर्वेक्षण प्रकल्पास, प्रकल्पातील ०१ पर्यावरण निरिक्षक तथा केमिस्ट व ०३ क्षेत्र सहाय्यक या ठोक वेतनावरील कर्मचाऱ्यांना दोन दिवसाचा विखंड देऊन ०३ जानेवारी २०२५ ते ३० नोव्हेंबर २०२५ पर्यंत मुदतवाढ मिळणेस प्रशासकीय व आर्थिक मंजुरीस्तव सविनय सादर.

(अजय वैद्य)
**प्रशासक तथा आयुक्त**
**भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका**